मूल्य १० रुपये

न मातुः पर दैवतम् ।

। जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।

# मातृसेवा



या देवी सर्वभूतेषु बुद्धि-रूपेण संस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।

वर्ष ५७ वे    २४ ऑक्टोबर २०२३    अंक १०



# मातृसेवा

कै. कमलाताई होस्पेट : संघसंस्थापिका

कै. प्रमिला दाणी : आद्य संपादिका

## स्थायी समिती (२०२१-२०२८)


- ❐ डॉ. अरुणा बाभुळकर : अध्यक्ष
- ❐ डॉ. लता देशमुख : सचिव
- ❐ श्रीमती शीला राव : संपादिका
- ❐ श्रीमती ममता चिंचवडकर
- ❐ श्रीमती सुरेखा देवघरे
- ❐ सौ. यश:श्री वाघ
- ❐ श्रीमती शोभा पारळकर
- ❐ श्रीमती वनिता पाटील : आमंत्रक


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | - शीला राव | ३ |
| शत प्रतिशत सत्य! | - दत्तप्रसाद दाभोळकर | ४ |
| लालबहादुर शास्त्री - एक प्रेरणादायी चरित्र | - शोभा पारळकर | ७ |
| मला भेटलेल्या कस्तुरबा | - मीना शेलगावकर | ९ |
| निरागस स्वर 'मालिनी' | - पं. अरुण कशाळकर | १२ |
| सात्त्विक गायकीचा नंदादीप | - साभार म.टा. | १४ |
| इसरोमध्ये असलेले हजारो शास्त्रज्ञ येतात... | - पी.आर.कुळकर्णी | १५ |
| जगेन तुझियासाठी | - अरुणा करंदीकर | १६ |
| आकर्षक ऑफर्स आणि सवलतींपासून दूर रहा | - रागिणी बक्षी | १७ |
| सौदामिनीतंत्र | - सुरेखा | १८ |
| काव्यरचनेला शतश: दंडवत | - सुनंदा कुळकर्णी | २० |
| संत तुकडोजी महाराज | - कुंदा वाडेकर | २१ |
| **शाखावृत्त** | | |
| अहवाल - मातृसेवा मासिक | - शीला राव | २३ |
| मातृ सेवा संघ - नंदनवन शाळा | - यश:श्री वाघ | २४ |
| डिस्ट्रीक्ट गव्हर्नर व्हिजिट | - चित्रा तत्त्ववादी | २५ |
| मातृ सेवा संघ, सीताबर्डी, नागपूर 'श्रीमती सुलभा यशवंत निमदेवकर' निर्माण फर्टिलिटी केंद्र उद्घाटन | - डॉ. लता देशमुख | २६ |
| मातृ सेवा संघ पंचवटी वृद्धाश्रम | - | २६ |
| संस्थापिकाद्वय पुरस्काराकरिता आवाहन | | २७ |


**कृपया नोंद घ्यावी, वार्षिक वर्गणी रु. २०० आहे लवकरात लवकर वर्गणी पाठवावी.**


कार्यालय : मातृसेवा संघ, सीताबर्डी, नागपूर - १० फोन : २५२२३९३, २५२२२८७, २५२३५९(२)

Website : http:/www.mss.org.in Email : matrusewa@yahoo.com

**अंक मिळत नसल्यास जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये तक्रार करावी.**

# संपादकीय

**– शीला राव**

आपले नागपूर भारताच्या मध्यभागी आहे असे म्हणतात. भारताचा 'झीरो माइल' इथे आहे. समुद्रकिनारा नाही किंवा मोठी नदी नाही. नागपूरचे नाव ज्यावरून पडले ती 'नागनदी' आहे फक्त ! गेल्या महिन्यात २२ तारखेला ह्या दुर्लक्षित नागनदीला महापूर आला आणि हजारो कुटुंबांचे नुकसान आणि थोडी जीवितहानीही झाली. नागपूर हादरून गेले. ह्या सगळ्याचे कारण काय? कशामुळे हे सगळे झाले? अतिवृष्टीमुळे, निसर्गाच्या प्रकोपामुळे किंवा मानवी चुकांमुळे?

अंबाझरी तलाव नागपूरचे भूषण आहे. त्याला पर्यटनस्थानाचे महत्त्व आहे. आता तर त्या परिसरातून मेट्रो जाते. आणि परिसराचे महत्त्व आणि सौंदर्य वाढविण्यासाठी विवेकानन्द स्मारकही उभारण्यात आले आहे. गावातही सगळे आधुनिकीकरणाच्या निमित्ताने सीमेंटचे साम्राज्य आहे. पूर्वीचे डांबरी रस्ते जाऊन खूप रस्ते आता सीमेंटचे झाले आहेत. पण सगळ्या गोष्टींमध्ये पाण्याचा निचरा कसा होईल ह्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झालेले दिसते. त्यामुळे अतिवृष्टी, ढगफुटी जी झाली त्यामुळे नागनदीच्या काठावरील अनेक घरांत, दुकानात आणि संस्थांमध्ये पाणी शिरून अपरिमित नुकसान झाले आहे. त्यामध्ये आपल्या मासिकाशी निगडित अशा कुटुंबांचा देखील समावेश आहे. घराचा पूर्ण तळमजला पाण्यात गेल्यानंतर ज्येष्ठ नागरिकांनी काय करावे? वरचा मजला घराला असेल तर तिथे कसेतरी जाता येईल. असो.

इतकेच वाटते की प्रकल्पाची आखणी करताना मनुष्याने, प्रशासनाने त्याबद्दल सारासार विचार करून, त्याचे दूरगामी परिणाम काय होऊ शकतात याचाही आढावा घेतला पाहिजे. सुभाषितकारांना उगीच म्हटलेले नाही ...

**चिन्तनीया हि विपदाम् आदौ एव प्रतिक्रिया ।**

म्हणजेच – तयार ठेवा उपाय आधी, आपत्तींचा येणाऱ्या ।।

आता आपल्या ह्या महिन्याच्या अंकाविषयी. नेहमीप्रमाणे अंक वाचनीय करण्याचा प्रयत्न केला आहे. अत्यंत गुणी गायिका मालिनी राजुरकर यांच्या विषयी लेख आहेत. शिवाय इतर विषयांविषयी आणि व्यक्ती ज्यांचे ह्या महिन्यात स्मरण करावयास पाहिजे, त्यांच्याविषयी काही लेख देण्याचा प्रयत्न केला आहे.

वाचकांकडून लेखांची आणि अभिप्रायाची नेहमीच अपेक्षा आणि विनंती आहे. विजयादशमीच्या शुभेच्छा आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत विजय प्राप्त केलेल्यांचे हार्दिक अभिनन्दन !

**मनुजाने नित यत्न करुनिया ।**
**प्राप्त करावे विजयाला।।**

---

# शत प्रतिशत सत्य!

**– दत्तप्रसाद दाभोळकर**

गांधीजीचे जीवन आणि तत्त्वज्ञान यांमुळे संमोहित होऊन त्यांच्याजवळ जगातील अनेक स्त्री–पुरुष आले. त्यात अर्थातच स्त्रियांची संख्या जास्त आहे आणि त्यात सर्वात महत्त्वाच्या आहेत मीराबेन. त्यांची आणि गांधीजींची एकमेकांतील भावनात्मक गुंतवणूक विलक्षण आहे.

मीराबेन म्हणजे मेडेलिन स्लेड. आमच्या साम्राज्यावरचा सूर्य कधीच मावळत नाही, ही दर्पोक्ती बरोबर घेऊन जगभर हिंडणारे ब्रिटिश साम्राज्य. त्या साम्राज्याचे प्रमुख शक्तिस्थल म्हणजे त्यांचे नौदल. त्या नौदलाचे सर्वेसर्वा एडमॉन्ट स्लेड यांची ही लाडकी मुलगी. म्हणजे आपल्या परिकथेतसुद्धा मावणार नाही असे समृद्ध, आनंदी बालपण तिला मिळालंय. तारुण्यात प्रवेश करत असतानाच ती बिथोव्हेनच्या संगीतात आकंठ बुडाली. हे संगीत खोल, गूढ, अंधारी गुहेत नेऊन आपल्याला अंतरात्म्याचा शोध घे म्हणून सांगते असे तिला वाटते. त्याच वेळी रोमारोला यांनी लिहिलेली बिथोव्हेन यांच्या आयुष्यावरील अकरा खंडांतील कादंबरी जिन ख्रिस्टॉफ तिच्या हातात पडते. तिच्या आणि रोमारोला यांच्या भेटी सुरू होतात. रोमारोला तिला सांगतात, 'संगीत तू फक्त माध्यम म्हणून वापरत आहेस. तुझा खरा प्रवास आहे अंतरात्म्याचा शोध घेण्याचा. मी लिहिलेले हे गांधीजींवरील पुस्तक वाच. आज येशू ख्रिस्त पुन्हा मानवरूपात या जगात हिंडतोय हे समजावे म्हणून महात्मा गांधींना भेट.'

गांधीजींना भेटावयाचे, त्यांच्या आश्रमात राहावयाचे, त्यासाठी प्रथम आपल्याला तयार केले पाहिजे. एक वर्ष ही मुलगी असिधारा व्रत स्वीकारते. दारू, मांसाहार बंद. जमिनीवर झोपायचे. आध्यात्मिक साहित्य वाचायचे. दिवसातून दोनदा टकळीवर सूत कातायचे. एका वर्षानंतर गांधी तिला आश्रमात येऊन राहण्याची परवानगी देतात. आश्रमातील आयुष्य यापेक्षा खडतर आहे, हे तिला समजते. ती ते सारे सहजपणे स्वीकारते. त्याच वेळी या आश्रमात कोणकोणत्या वाईट गोष्टी चालताहेत हे आपल्या भिरभिरत्या नजरेने टिपून त्यांना सांगते.

गांधीजीचे जेवण, त्यांच्या वेळा, त्यांची विश्रांती, अंघोळीसाठी त्यांना लागणारे कोमट पाणी हे सारे आता मीराबेन बघताहेत. मुलीने थकलेल्या वडिलांची काळजी घ्यावी, आईने मुलाची काळजी घ्यावी असे काही.

मीराबेन यांचे आत्मचरित्र आपल्या दृष्टीने एका वेगळ्या कारणामुळे फार महत्त्वाचे आहे. कारण मीठ सत्याग्रहापासून अगदी फाळणीपर्यंत गांधीजीच्या मनातील तगमग आणि त्यावेळी भोवताली नक्की काय घडत होते, याच्या आपल्याला माहीत नसलेल्या गोष्टींची तिने नोंद केली आहे. उदाहरणार्थ, फक्त दोन प्रसंग सांगतो.

भगतसिंगांना फाशी होईल म्हणून सारा देश केवळ अस्वस्थ नाही, तर प्रक्षुब्ध होता.... गांधींनी 'भगतसिंगांना फाशी देऊ नका' म्हणून व्हाइसरॉयला पत्र

पाठवले होते. गांधी-आयर्विन करार करू शकणारे आपले नेते ही फाशी रद्द करू शकतील, असा जनतेचा विश्वास होता. मात्र गांधी कराचीला जाण्यासाठी रेल्वेत चढत असतानाच सरकारने भगतसिंग आणि त्यांच्या दोन सहकाऱ्यांना फाशीवर चढवले. भगतसिंग यांच्या सुटकेसाठी एका शब्दानेही कधी काही प्रयत्न न केलेल्या संघटनेने आणि पक्षाने ही फाशी गांधीजींमुळे झाली हे आपल्या कुजबुज आघाडीतून सर्वत्र पसरवले. सुकुर या स्टेशनवर मध्यरात्री गाडी थांबली. संतप्त तरुण हातात लाठ्या-काठ्या घेऊन गांधींना शोधत डब्यात डोकावत होते. गांधी झोपलेले. डब्यात फक्त मीराबेन आणि आणखी दोघे. मीराबेन यांनी डब्याच्या खिडक्या दरवाजे बंद केले. गाडी सुरू झाली आणि डोके रक्तबंबाळ झालेला एक तरुण शौचालयाच्या खिडकीची काच आपल्या डोक्याने फोडून शौचालयाच्या दारातून रेल्वेच्या त्या डब्यात शिरला.

गांधी दुसऱ्या गोलमेज परिषदेत सामील झाले. मात्र, तेथे गोलमेज परिषदेला जायचे की नाही हे २६ ऑगस्टच्या व्हाइसरॉयबरोबर होणाऱ्या चर्चेत काय आश्वासने मिळतात यावर गांधी ते ठरवणार होते. २७ ऑगस्टला यांना गांधीजी आपण जाण्याचे ठरल्याची तार सकाळी मीराबेन मिळाली. बोट २९ ऑगस्टला सुटणार होती. पासपोर्टपासून बरोबर काय सामान घ्यायचे हे ठरवून मीराबेन आणि प्यारेलाल, महादेव असे फक्त तीन-चार जण त्यांच्याबरोबर बोटीवर आहेत. गांधीजींचा बोटीवरचा पहिला प्रश्न, 'तुम्ही सामान म्हणून काय बरोबर घेतलंय?' या चौघांनी भरपूर माहिती काढून, खूप विचार करून अगदी आवश्यक असे सामान सात-आठ मोठ्या ट्रंक भरून बरोबर घेतलेले. हे समजल्यावर गांधी म्हणाले, 'मला आणि तुम्हालाही अगदी आवश्यक तेच बरोबर असेल. फक्त एकदोन ट्रंकमध्ये मावणारे. बाकी सर्व वस्तू एडनला बोटीतून खाली उतरवा, नाही तर मी बोटीतून खाली उतरेन !'

त्या वेळी गांधींनी आपला वेश आणि दिनक्रम अजिबात बदलला नाही. गोलमेज परिषदेतील बोलणी संपवून गांधी रात्री एक वाजता परत आले, तरी पुन्हा पहाटे तीन वाजता गजर लावून उठत आणि या पहाटेच्या प्रार्थनेत या चौघांनाही सामील व्हावे लागे. आपल्या समोर येते ती युरोपातील गांधीजींची प्रचंड लोकप्रियता. प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक रेल्वे स्टेशनवर आवरता येणार नाही अशी तुडुंब गर्दी. गांधींच्या संरक्षणासाठी दिलेल्या साध्या वेशातील कमांडोने नोंद केली आहे. आम्ही राजघराण्यातील माणसांबरोबरही सर्वत्र हिंडलोय, पण अशी गर्दी कुठेच जमलेली नाही. पोपने त्यांना आग्रहाने व्हॅटिकन येथे येण्याचं आमंत्रण दिलंय आणि गांधीजींनी ते स्वीकारलंय. मुसोलिनीने त्यांच्याकडून वेळ मागितला आहे आणि गांधींनी तो दिला आहे. हे सर्व करत असतानाच गांधीजींनी पाच दिवस रोमारोला यांच्याबरोबर दिवसभर चर्चा केल्यात. त्या वेळी रोमारोला यांनी मित्रांना पत्र पाठवून कळवलंय, 'या वेळी तुम्ही येथे हवे होतात. आध्यात्मिक उंची म्हणजे काय ते तुम्हाला समजले

असते. आपण कसे आणि किती बदललो हे गांधींनी किती नेमके सांगितले. ते म्हणाले, ‘मी प्रथम परमेश्वर म्हणजे सत्य असे समजत होतो. आता मला समजलंय सत्य म्हणजे परमेश्वर.’

मी वर सांगतोय ते ‘कटोरी में गंगा’. स्वातंत्र्यलढ्यातील अनेक अज्ञात गोष्टी आपणासमोर उलगडत जातात. इंग्रजांचे दमनचक्र सुरू झालंय. सारे नेते तुरुंगात आहेत. गांधीजी आणि त्यांची चळवळ जगभर बदनाम केली जात आहे. भूमिगत होऊन या देशात काय चाललंय याचा सविस्तर वृत्तांत मीराबेन जगभराच्या वृत्तपत्रांना पाठवत राहतात. त्यांना एक वर्षाची शिक्षा होऊन आर्थर रोड तरुंगात ठेवतात. भोवताली फक्त अगतिक अवस्थेत देहविक्रय करणाऱ्या आणि त्याच मनःस्थितीत खून करणाऱ्या स्त्रिया. ती बाहेर आल्यावर गांधी तिला परदेशात जाऊन भारताचा स्वातंत्र्यलढा समजावून देण्यास सांगतात. मीराबेन इंग्लंड, अमेरिकेत भाषणे देतात. चर्चिल, मजूर पक्षाचे पुढारी यांना भेटतात. अमेरिकेत रुझवेल्टच्या बायकोला भेटतात. त्यानंतर आगाखान पॅलेसमधील गांधीजींच्या अटकेत तिच्या आणि गांधींसमोर महादेव आणि कस्तुरबा यांचा देहान्त झालाय आणि त्या गांधींना आधार देत उभ्या आहेत. फाळणीचे दुःख, गांधीजींचा खून अशा अनेक घटना संयत, संयमी शब्दांत पण आपल्याला हलवून टाकत त्यांनी शब्दांकित केल्यात. त्यांची आणि गांधीजींची एकमेकांतील सहजसुंदर गुंतवणूक दाखविणारी काही पत्रे पुस्तकात आहेत. त्यातील गांधीजी बोरसाडला आहेत. हवामान प्रचंड खराब, हिच्या प्रकृतीला हे झेपणार नाही, तू आता सेवाग्रामला जा म्हणून गांधीजी चिडचिड करतात. रागावून तीपण सेवाग्रामला जाते. दुसऱ्या दिवशी गांधीचे पत्र येते, ‘तू मनामध्ये सतत असतेस. मी चरखा चालू करतो, तुझी आठवण येते, पण आज त्याचा काय उपयोग? मात्र एक लक्षात ठेव. सारे सुख, सारी जवळची माणसे या सर्वांना सोडून माझी व्यक्तिगत सेवा करण्यासाठी तू आलेली नाहीस. तू मी जी मूल्ये जीवनात पाळतो, त्या मूल्यांचे आचरण आणि प्रसार करण्यासाठी आलेली आहेस. मात्र, येथे सर्व वेळ तुझे लक्ष माझ्यावरच केंद्रित केले होतेस. तुझ्या सेवेचा मी दुरुपयोग करून घेतो, असं मला वाटत राहिले. त्यामुळे मी क्षुल्लक कारणावरून रागावत असे. मी तुझ्याकडून सेवा करत असताना माझी अग्निपरीक्षा अनुभवत होतो.’

मीराबेन तुरुंगात असताना, त्यांच्यासमोर दोन पर्याय आहेत. त्यांना भेटायला आठवड्यातून एक माणूस येऊ शकेल किंवा त्या आठवड्यातून एक पत्र लिहू शकतील. त्यांनी अर्थातच दुसरा पर्याय निवडला आणि त्यांना पाठविलेल्या पहिल्या पत्रात गांधी लिहितात, ‘स्वतःला शोधण्यासाठी तुरुंगासारखी दुसरी जागा नाही. तुला बायबल आणि येशू माहित आहेत. आता कुराण आणि अमिर अलीचे ‘स्पिरीट ऑफ इस्लाम’ या पुस्तकांचा अभ्यास कर. वेद, महाभारत, रामायण, उपनिषदे वाच, तुला हिंदू तत्त्वज्ञानाचे अंतरंग समजेल.’

मीराबेन यांच्या या आत्मचरित्रात अशा अनेक गोष्टी आहेत त्यातील आणखी एक सांगतो, आपणाला डोळस करणारी– 'तुला येशू ख्रिस्तांना भेटावयाचे असेल तर गांधींना भेट' म्हणून सांगणारे रोमारोला गांधींना प्रथम भेटले ते गोलमेज परिषदेच्या वेळी आणि त्या वेळी जाताना ते मीराबेन यांना म्हणाले, 'मुली, मला गांधीजींच्यात विवेकानंदांचा अंश दिसतो.'

---

## लालबहादुर शास्त्री–एक प्रेरणादायी चरित्र

**– शोभा पारळकर**

राष्ट्रपिता महात्मा गांधी व देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, ह्या दोन महान व्यक्तींचा जन्म २ ऑक्टोबर रोजी झाला हा शुभयोगच. शास्त्रीजींच्या प्रेरणादायी जीवनाविषयी आज जाणून घेऊया.

शास्त्रीजीचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ रोजी वाराणसी जवळील मुगलसराय ह्या लहानशा गावात झाला. ते दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचं निधन झाले. त्यानंतर त्यांची आई दुलारीदेवी तीन मुलांना घेऊन माहेरी, मिर्झापूर येथे आली. शास्त्रीजींचे प्राथमिक शिक्षण तेथे झाले पण काही वर्षांनी त्यांच्या आजोबांचेही निधन झाले. त्यांच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी त्यांच्या मावशीच्या यजमानांनी, रघुनाथप्रसाद ह्यांनी उचलली. त्यांचे शालेय शिक्षण हरिश्चंद्र हायस्कूलमध्ये व पुढील शिक्षण काशी विद्यापीठात झाले. त्यांना संस्कृत विषयांत स्नातक झाल्यावर 'शास्त्री' ही उपाधी देण्यात आली. त्यानंतर त्यांनी आपले जातिबोधक आडनाव–श्रीवास्तव हे बदलून शास्त्री हेच नाव धारण केले व तेच पुढे रूढ झाले.

दुलारीदेवींनी अतिशय कष्ट करून मुलांचे शिक्षण केले. पण शास्त्रीजींचे बालपण हे विपन्नावस्थेतच गेले. त्यांची शाळा गंगानदीच्या पलिकडच्या तीरावर होती व विद्यार्थी नांवेतून पलिकडे जात असत. त्यासाठी नावाड्याला रोज दोन आणे द्यावे लागत. ते शक्य नसल्याने, शास्त्रीजी स्वतः नदीतून पोहून जात व त्यांचे कपडे व पुस्तके नावेतून नेण्यासाठी नावाड्यास एक आणा देत असत. शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांनी अनेक कष्ट सोसले.

पुढे १९५८ साली त्यांचा विवाह ललितागौरी ह्यांचेशी झाला. ललितागौरी ह्याबद्दल त्यांच्या आत्मचरित्रांत लिहितात, ''शास्त्रीजीचे तरुण स्वांतत्र्यसेनानी व स्वाभिमानी देशप्रेमी हे रूप मला अत्यंत प्रिय वाटे व ह्या तरुणाशी आपला विवाह व्हावा म्हणून मी देवीची मनोभावे पूजा करीत असे. त्यांच्या अम्माजींना रामायण वाचून दाखवण्याच्या निमित्ताने मी त्यांच्या घरी जात असे. पुढे लग्नानंतर देखील रामायण वाचून दाखवण्याचा कार्यक्रम पूर्ववत् सुरू राहिला. अम्माजींना झोप लागल्याशिवाय तेथून माझी सुटका होत नसे.''

शास्त्रीजी प्रखर गांधीवादी होते. त्यांची राहाणी अत्यंत साधी होती. कष्टाची त्यांना सवय होती व मन देशप्रेमाने ओतप्रोत भरलेले, त्यामुळे स्नातक

झाल्यानंतर ते भारत सेवक समाजाशी संलग्न झाले व त्यांनी प्रत्येक आंदोलनांत हिरिरीने भाग घेतला, फलस्वरूप अनेकदा कारावासही सोसावा लागला. १९२१ साली असहयोग आंदोलन, १९३० मध्ये दांडीयात्रा, १९४२ साली भारत छोडो आंदोलनात त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. गांधीजीनी यावेळी 'करो या मरो' हा नारा दिला त्यात ९ ऑगस्ट १९४२ च्या सभेत, 'मरो नहीं मारो' हा नारा देऊन शास्त्रीजींनी तरुणांना आवाहन केले. त्यावेळी ते ११ दिवस भूमिगत राहिले. परन्तु १९ ऑगस्टला पकडले गेले व पुन्हा बंदिवास स्वीकारावा लागला.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ते उत्तर प्रदेश संसदेत सचिव म्हणून नियुक्त झाले. पुढे गोविंद वल्लभपंत ह्यांच्या मंत्रिमंडळात त्यांना पोलीस व परिवहन विभागाचे मंत्रीपद देण्यात आले. त्यावेळी आंदोलनकर्त्यांवर लाठीचा वापर करण्याऐवजी पाण्याचा मारा करण्यात यावा, हा महत्त्वाचा निर्णय त्यांनी घेतला. ह्यानंतर ते अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे महासचिव नियुक्त केले गेले व त्यांनी शेवटपर्यन्त प्रचार-प्रसार करून काँग्रेस पक्षाला अत्युच्च स्थानी नेऊन ठेवले.

पंडित नेहरू ह्यांच्या आकस्मिक निधनानंतर, त्यांची योग्यता ओळखून शास्त्रीजींना प्रधानमंत्री करण्यात आले. तो काळ राष्ट्राच्या दृष्टीने परीक्षेचा होता. तशातच १९६५ मध्ये एका संध्याकाळी पाकिस्तानने भारतावर हवाई हमला केला. राष्ट्रपती राधाकृष्णन् ह्यांनी तिन्ही सेना प्रमुखाची बैठक बोलावली. ह्यावेळी शास्त्रीजींनी सेनाप्रमुखांशी विचार-विनिमय करून महत्त्वपूर्ण निर्णय घेतले व आपण हे युद्ध जिंकले. तीन वर्षापूर्वी चीनशी युद्धात हरल्याने भारताची प्रतिमा काहीशी डागाळली होती; ती ह्या विजयाने सावरली गेली.

शास्त्रीजी पंतप्रधान निवासांत राहायला गेले, त्यावेळचे काही प्रसंग अतिशय भावुक आहेत. ललितागौरी ह्यांची शास्त्रीजींच्या प्रति निष्ठा व प्रेम ह्यातून व्यक्त होते. त्यांनी जन्मभर नवऱ्याला दोन गरम फुलके स्वतःच्या हाताने करून वाढण्याचे व्रत सांभाळले होते. पंतप्रधान निवासात स्वयंपाकघर व शास्त्रीजींचे कार्यालय यामध्ये एक लांबचलांब कॉरिडोअर होते. ललितागौरी त्यांचे जेवण, अनवाणी चालत जाऊन, त्यांना नेउन देत व स्वतः समोर जेवायला लावत असत.

ते पंतप्रधान झाल्यावर शास्त्रीजींच्या मुलीने त्यांच्या आईला-ललितागौरी ह्यांना म्हटले, ''अम्मा अब आप दो चार ढंग की साडियाँ खरीद लो।'' त्यावर ललिता भोळेपणाने शास्त्रींना म्हणाल्या, 'आप भी चलिए ना!' किती साधी राहाणी व किती सोज्वळ स्वभाव !

मंत्री झाल्यावर शास्त्रींनी दिल्लीच्या बँकेत अकाउंट उघडला. त्यांच्या मुलांनी एक चारचाकी गाडी घेण्याचा प्रस्ताव पित्यासमोर मांडला. तेव्हा स्वतःच्या अकाउंटमधले ५००० रुपये त्यांनी पहिला हप्ता म्हणून दिले व नंतरचे २००० रुपये, तीन हप्त्यात स्वतःच्या पगारातून भरले. आज हे वाचून खरे वाटत नाही.

शास्त्रींची कारकीर्द केवळ १८ महिन्यांची होती. ह्या अल्प काळात त्यांनी

'जय जवान, जय किसान' हा नारा देऊन देशासाठी लढणाऱ्या सैनिकांबरोबर देशाचे पोट भरणाऱ्या शेतकऱ्यांचाही सन्मान केला. देशात अन्नधान्याची परिस्थिती त्यावेळी बिकट होती व धान्य परदेशातून मागवावे लागत असे. त्यावेळी दिवसा एकच वेळ जेवून राहाण्याचा प्रयोग शास्त्रींनी स्वतःच्या कुटुंबात केला व नंतर तो प्रयोग देशात करण्यात आला. दर सोमवारी उपहारगृहे बंद ठेवून आपण अन्नाची बचत करू शकतो व स्वावलंबी बनू शकतो हे त्यांनी दाखवून दिले.

अमेरिका व रशिया ह्यांच्या दबावाखाली येऊन शांतता करारावर भारताने सह्या कराव्या यासाठी पाकिस्तानचे राष्ट्रपती अयूब खान हे ताश्कंदमध्ये भेटणार होते. शास्त्रीजींवर दबाव आणून बलाढ्य राष्ट्रांनी या करारावर त्यांना स्वाक्षरी करण्यास भाग पाडले. त्याच रात्री शास्त्रीजींचे हृदय विकाराने निधन झाले, असे सांगण्यात आले. त्यांच्या मृत्यूचे गूढ अजूनही उकलले नाही. मोरारजी देसाईंनी पंतप्रधान झाल्यावर याची चौकशी पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला परन्तु तो निष्फळ ठरला. इतक्या कमी काळात, एक अमिट ठसा शास्त्रीजी ठेवून गेले हे खरे. मरणोपरान्त त्यांना 'भारतरत्न' त्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवण्यात आले.

---

## मला भेटलेल्या कस्तुरबा – भारतीय स्त्री सेनानी

**– डॉ. मीना शेलगांवकर**

साऊथ आफ्रिकेच्या सहलीमध्ये आमचं मुख्य राहण्याचे ठिकाण होतं डर्बन. एखादा देश फिरत असताना तिथली सस्कृती, त्या देशाचा इतिहास याबद्दल माहिती करून घ्यायला मला आवडतं. याच कारणासाठी इनंडा (Inanda) हेरिटेज टूर ही एक दिवसाची सहल आम्ही बुक केली होती. या सहलीमध्ये खमेलू सग्रंहालय (KhaMule museum), गांधीजी साऊथ आफ्रिकेमध्ये राहत असताना त्यांचे राहण्याचे ठिकाण म्हणजे फिनिक्स सेटलमेंट आणि जॉन दुबे यांची शाळा (Ohlange institute)

इनांडा व्हॅली असा तो ४०-५० किलोमीटरचा प्रवास आहे.

साऊथ आफ्रिकन लोकांनी केलेल्या सघर्षाची कहाणी खमेलू सग्रंहालय येथे अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. तिथले फोटोग्राफ्स पाहताना, तिथे बनवलेले मूर्ती स्वरूपातील संघर्षाची दृश्य आणि चित्रमय कहाण्या हे पाहत आणि ऐकत असताना, अगांवर काटा येतो. मनुष्य हा एकच प्राणी असा आहे की जो आपल्याच जातीतील इतर माणसांची व विशेषतः स्त्रिया व मुलांशी अत्यंत क्रूरपणे वागतो. आपल्याच जातीतल्या इतर माणसांची सत्तेसाठी, श्रीमतीसाठी हत्या करतो. मनुष्य हा दुसऱ्या मनुष्याशी कि ती क्रूरपणे वागू शकतो याचे हे सग्रंहालय म्हणजे मूर्तिमंत उदाहरण आहे.

आमची गाईड व चालक होती झाला नावाची धिप्पाड झुलू स्त्री. अत्यंत हुशार होती बोलण्यात. आफ्रिकन काळ्या स्त्रियांवर गोऱ्या लोकांनी केलेले अत्याचार

सांगत असताना भारतीय स्त्रियांची खूप स्तुती करत होती. (साऊथ आफ्रिकामध्ये बोर (लेरी) हेडच लोक राज्य करत होते.)

भारतीय लोकांनाही गोऱ्यानी ऊस शेती करायला साऊथ आफ्रिकेत खूप मोठ्या संख्येने आणले होते. खूप चांगली स्वप्न दाखवून त्या मजूरांना खूप वाईट अवस्थेत ठेवले होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गोऱ्यांनी असा कायदा केला होता की भारतीयाचे भारतातील लग्न साऊथ आफ्रिकेत बेकायदेशीर आहे आणि त्यामुळे त्यांची बायका मुले अनौरस ठरली होती. झाला भारतीय लोकांच्या कुटुंब व्यवस्थेची तारीफ करत होती. तिच्या म्हणण्याप्रमाणे भारतीय स्त्रियांना त्यांच्या कुटुंबियांचे संपूर्ण संरक्षण मिळत असे आणि भारतीय पुरुष आपल्या स्त्रियांना परक्यांच्या घरी कामासाठी मोलमजुरीसाठी पाठवत नसत. त्यामुळे आफ्रिकन स्त्रियांचे जे लैंगिक शोषण झाले व त्यांच्यापासून काळी गोरी पोरे जन्माला आली, तसे भारतीय स्त्रियांच्या बाबतीत झाले नाही. आफ्रिकन स्त्रियांना त्यांच्या समाजामध्ये व्यवहारासाठी वापरले जाई. एखादा मोठा व्यवहार करायचा असल्यास एक आफ्रिकन स्त्री व ११ गाई असा सौदा केला जाई. सत्ताधारी गोऱ्या लोकांनी भारतीयांची कुटुंब व्यवस्था कायद्याने निकामी ठरवली होती. एखाद्या समाजाला कसे तोडायचे हे त्यांना बरोबर समजले होते असे म्हणायला हवे. अशा परिस्थितीमध्ये साउथ आफ्रिकेतील भारतीय स्त्रियांना भक्कम आधार मिळाला तो वकील मोहनदास करमचंद गांधी व त्यांची पत्नी कस्तरुबा गांधी यांचा. ह्या लग्न बेकायदेशीर ठरवणाऱ्या कायद्याविरुद्ध प्रथम सत्याग्रह करणारी भारतीय स्त्री होती कस्तुरबा गांधी आणि तिच्या कुटुंबातील चार स्त्रिया.

मोहनदास करमचंद गांधी हे जेव्हा साउथ आफ्रिकेत एक वकील म्हणून कोर्ट केस लढण्यासाठी गेले त्यावेळेस त्यांना फक्त गोऱ्या लोकांसाठी असणाऱ्या रेल्वेच्या डब्यात, योग्य तिकीट असूनही बसले म्हणून, रेल्वेच्या बाहेर फेकून देण्यात आले ते ठिकाण होते डर्बन. केस तर लढायची होती म्हणून गांधीजी डर्बनच्या जवळ सध्याची जी फिनिक्स सेटलमेंट आहे त्या ठिकाणी स्थायिक झाले. ही जागा त्यांनी विकत घेतली व कस्तुरबा व दोन मुलांना तेथे आणून त्यांनी संसार सुरू केला. हळुहळू भारतीय लोकांच्या वर, मजुरांवर होणारे अत्याचार व अन्याय याच्याविरुद्धही गांधीजी लढू लागले. अनेक भारतीय लोक त्यांच्या वसाहतीत येऊन स्थायिक झाले. या सर्वांमध्ये कस्तुरबांचा सहभाग व पुढाकार खूप मोठा महत्त्वाचा व स्पृहणीय होता. विचार केला की लक्षात येते की आपल्याला आपला इतिहास खरोखरच माहिती नाही. म्हणजे भारतीय लोकांच्या दृष्टिकोनातून आपला इतिहास लिहिलेला नाही. जो काही इतिहास शाळांमध्ये शिकवला जातो तो त्या त्या वेळेच्या राज्यकर्त्यांनी लिहिलेला इतिहास आहे. कस्तुरबा गांधींबद्दल मला खरंच फारसं माहिती नव्हतं. मला नेहमी वाटायचं की वटवृक्षाच्या छायेतील काही लपलेली व्यक्तिमत्वे असतात तशा कस्तुरबा आहेत. परंतु साऊथ आफ्रिकेतील सफरीमुळे मला कस्तुरबा गांधी ही एक अत्यंत विचारी धडाडीचे व येणाऱ्या प्रसंगाला खंबीरपणे तोंड देणारी अशी स्त्री

ऐकायला मिळाली. आजही फिनिक्स सेटलमेंट ही गांधी कुटुंबियांची खाजगी मालमत्ता आहे. तेथील सग्रंहालयामध्ये बहुतांशी कस्तुरबांविषयीच्या कथा आहेत. त्यांनी लग्न बेकायदेशीर ठरवणाऱ्या कायद्याविरुद्ध केलेला सघंर्ष, भोगलेला तुरुंगवास, तिथे उपासमारीमुळे जवळपास मरणासन्न झालेली अवस्था अशा अनेक गोष्टींच्या नोंदी आहेत. एका भारतीय पुरुषामागे एक खंबीर स्त्री असते जी त्याच्या सुखदु:खामध्ये मनापासून सहभागी होते ही भारतीय संस्कृतीची परंपरा आफ्रिकन स्त्रियांना फार जास्त भावते.

भारतीय स्त्रियांना कुटुंबाचा जो आधार मिळतो व एक स्त्री म्हणून जो मान मिळतो त्यासाठी आफ्रिकन स्त्रियांना त्यांचे खूप कौतुक वाटते. फिनिक्स सेटलमेंटमध्ये आजही कस्तुरबा गांधी विद्यालय ही मुलींची शाळा आज ही जोमाने चालू आहे. आम्ही गेलो त्यावेळेस शाळेची मधली सट्टी होती त्यामुळे मुलींचा किलबिलाट त्यांचं बागडणे याचा आनंद आम्हाला घेता आला.

कस्तुरबा गांधी ह्यांच्या कर्तृत्वाची ओळख मला डर्बनमध्ये प्रकर्षाने झाली असं मी पुन्हा पुन्हा म्हणते त्याचं कारण म्हणजे आमची गाईडच्या प्रत्येक दोन वाक्यांमध्ये भारतीय स्त्री, कस्तुरबा गांधी आणि भारतीय सस्ंकृती यांचा अत्यंत आदराने उल्लेख येत होता. तिच्या म्हणण्याप्रमाणे स्त्रियांनी आपल्या नवऱ्याच्या मागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे आणि त्याच्याशिवाय इतर सर्व पुरुष ही परकीय आहेत ही भावना आफ्रिकन सस्ंकृतीसाठी व गोऱ्या सस्ंकृतीसाठीही पूर्णपर्ण भिन्न होती. त्यामुळे बेकायदेशीर लग्न ठरवून भारतीय स्त्रियांचे शोषण करणे गोऱ्या लोकांना कठीण गेले. अर्थात आपल्या इतिहासामध्येही जाहिर करण्याच्या कितीतरी घटना आहेत. दुसऱ्या महत्त्वाचा भारतीय संस्कृतीचा भाग आमच्या गाईडच्या म्हणण्याप्रमाणे हा भारतीय कुटुंबामध्ये स्त्रियांविषयी असलेला आदर व तिच्या सरंक्षणासाठी कुटुंबातील तत्पर असलेले पुरुष हा होता आणि कस्तुरबा गांधी व कुटुंबीयांनी या भारतीय सस्ंकृतीचे जतन साऊथ आफ्रिकेमध्ये नुसते स्वत:पुरते केले नाही तर कस्तुरबांच्या मुळे तेथील इतर भारतीय कुटुंब व स्थानिक लोक यांना एकत्र आणण्यासाठी केला गेला.

गांधीजींच्या फिनिक्स सेटलमेंटच्या जवळ दुसरी अशीच प्रबळ व्यक्ती होती ती म्हणजे जॉन दुबे, ज्यांना तिथे फर्स्ट प्रेसिडेंट म्हणून ओळखले जाते. ह्या जॉन दुबेनी ह्यूलांगेसंस्थेची स्थापना केली. आफ्रिकन मुलांसाठी ही पहिली शाळा सुरू केली. तसेच अमेरिकन मिशनरींनी तेथेच आफ्रिकन मुलींसाठी शाळा सुरू केली.

ह्यूलांगे शाळेमध्ये मुलांना मुख्यतः कौशल्य प्रशिक्षणाचे धडे दिले जात. हात, हृदय व मेंदू या तिन्हींना योग्य प्रकारे कसे काम मिळेल याचे शिक्षण हा ह्यूलांगे संस्थेचा गाभा होता. तर आफ्रिकन मुलींना बाहेरच्या विकसित जगामध्ये कसे वागावयाचे सपंर्णू शिक्षण दिले जात असे. ह्या दोन्ही शाळा सुमारे शंभर वर्ष जुन्या आहेत. या दोन वसाहती शेजारी तिसरी वसाहत होती, कल्चर कम्यनिुनिटीची. ही

गौरवर्णीय मुलेमुली आफ्रिकन आईपासून जन्माला आलेली असत. बाप जरी गोरा असला तरी या मुलांना गोरेलोक आपल्या बरोबरीने वागवत नसत.

त्यामुळे तेथे ही एक मधलीच कलर्ड कम्युनिटी तयार झाली होती. ह्याच्या शेजारीच नेल्सन मंडेलाही राहत असत. या सर्वांचा परिणाम असा झाला झाला की परिस्थितीमुळेही कलर्ड कम्युनिटी, इंडियन कम्युनिटी व साऊथ आफ्रिकन नेटिव्ह कम्युनिटी हे एकत्र आले व त्यांना गोऱ्या लोकांमध्ये मिसळता येत नसल्यामुळे एवढेच नव्हे तर त्यांना जबरदस्तीने एकत्र राहण्यास भाग पाडल्यामुळे आफ्रिकन व भारतीय मूळ सस्कृती साऊथ आफ्रिकेमध्ये टिकून राहिल्या. एवढेच नव्हे तर त्यांचा एकमेकांच्या साथीमुळे एकत्रित सामजंस्याने विकासही झाला आणि ह्या सर्व सामाजिक बदलास कारणीभूत होते जॉन दुबे व गांधी कुटुंबीय. गांधीजी पुढे भारतात आले व त्यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी जे केले हे सर्व आपल्याला माहिती आहेच.

पण मला असे वाटले की डर्बनमध्ये कस्तुरबा गांधीजीनी, जो पहिला सत्याग्रह केला, लग्नाविरुद्ध जाचक कायदा रद्द करण्यासाठीचा, ती पुढील स्वातंत्र्य चळवळीचा पाया ठरला असावा. भारतीय स्त्रीशक्तीला माझा मानाचा मुजरा.

---

## निरागस स्वर‘मालिनी’

**– पं. अरुण कशाळकर**

सांगितिक आकाशात पाच दशकांपेक्षाही अधिक वर्ष अखंड तेवत असलेला नंदादीप आज निमालाय. स्वकर्तृत्वानं सप्तसुरांच्या मंदिरात तेवताना अचानक आलेल्या झंझावातात ही स्वरज्योत विझून गेली आहे. असंख्य श्रोत्यांच्या मनात स्वरांचं चांदणं फुलवणारी पौर्णिमा आज लुप्त झाली. मालिनीताई गेल्या, मालिनीताईंना श्रद्धांजली अर्पित करताना त्यांच्या जीवनाचा आणि विचारांचा मागोवा घेणं मार्गदर्शक ठरेल. संस्कार, सहवास, सातत्य, दृढनिश्चय आणि प्रामाणिकपणानं आयुष्याला सामोरं जाण्याची उर्मी यांतून त्यांचं आयुष्य घडलं. स्वकर्तृत्वाचा कुठलाही अभिनिवेश न बाळगता जे केलं, ते प्रामाणिकपणे केलं. जे घडलं, ते स्वाभाविकपणे घडलं आणि ते सहजपणे स्वीकारलं, या विचारांनी जगलेल्या मालिनीताई आपलं यशही सहजपणानं पचवू शकल्या.

मातृभाषेतून कुठलाही विषय शिकल्यास तो सहज समजू शकतो आणि त्यात प्रावीण्यही मिळवता येतं. आपली आई आपल्याला सहजगत्या बोलायला शिकवते आणि आपण बोलत जातो. स्वरभाषा हीच मातृभाषा असेल, तर मग आपण थेट गायलाच लागतो. मग इथं त्या भाषेचं व्याकरण औपचारिक ठरतं. स्वरभाषेसंदर्भात बोलीभाषेतला ‘ओनामा’ अर्थात सरगम किंवा अआईई मात्र नंतर उलट्या क्रमानं सुरू होतो. तो उलटा वाटला, तरी हाच खरा क्रम असतो. माणूस तंतोतंत गाण्याची नक्कल सारेगम न शिकताच करत असतो. असं गायला लागल्यावर तो सारेगम आपसूक गायला लागतो. गाण्याची भाषा, भाव आणि गाण्याचं वातावरण

आजूबाजूला असेल, तर गाते होण्यासाठी 'ओनामा' गिरवण्यापासून सुरुवात करावी लागत नाही. पहिल्या दिवसापासूनच घराण्याच्या गायकीचं बाळकडू मिळालं, तर गाण्यातल्या आकार-उकारांसकट सगळं गाणं घोटलं जातं; त्यामुळे त्याचा गाण्यात थेट प्रवेश होतो.

संगीत बीजरूपात घेऊन मालिनीताई १९४१ मध्ये अजमेर इथं जन्माला आल्या. त्यांना संगीताचं हे बीजरूप आईकडून मिळालं. आपल्याजवळ हे बीज आहे याची जाणीव सतत करून देणारं कुटुंब त्यांना केवळ माहेरीच नव्हे, तर सासरीही मिळालं. गणित या विषयातली पदवी संपादन केल्यानंतर त्यांना कलेसाठी तीन वर्षांची शिष्यवृत्ती मिळाली. त्या वेळी त्या अजमेर इथल्या शाळेत शिक्षक म्हणून काम करत होत्या. विद्यादान करताना, गणिती पदावल्या सोडवताना त्या सहजभावानं स्वतःत लपलेल्या तालाचा हिशोब कलेच्या शिष्यवृत्तीचा उपयोग करून त्या जुळवू शकल्या. दशमान, अंश-छेदाची गणितं सोडवताना त्या स्वतःतला संगीतांश जोपासू शकल्या.

ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीसाठी त्यांचा आवाज हा सुयोग्य झाला, तो अजमेरच्या अजमेर संगीत महाविद्यालयात गोविंदराव राजूरकर आणि त्यांचा पुतण्या वसंतराव राजूरकर यांच्याकडे. पुढे वसंतराव राजूरकर यांच्याशी त्यांचा विवाह झाला. स्वगृह हेच गुरुगृह ठरावं आणि प्रत्यक्ष पतीकडूनच गुरुमुखी विद्या मिळावी असा योग जुळून आल्यावर विद्या आत्मसात करायला कितीसा वेळ लागणार! ग्वाल्हेर घराण्याचं गाणं त्यांना योगायोगानं मिळालं असं म्हटलं, तर ते वावगं होणार नाही; त्यामुळे मी अमुक घराण्याचं गाणं शिकते आहे, असा अभिनिवेश त्यांच्या गायनात कधीच डोकावला नाही.

गुरुगृही आणि गुरुमुखी गाणं मालिनीताईंना मिळाल्यामुळे त्यांचा प्रत्येक सूर गुरूनं पक्का करून घेतला. सुराच्या बाबतीत एक लक्षात घेतलं पाहिजे, ते म्हणजे आयुर्वेदातलं औषध उगाळून तयार करताना त्याचे विशिष्ट फेरे झाले, की मगच त्याची परिणामकारकता वाढते, तसंच सुरांचंही आहे. मालिनीताईंकडून प्रथम गोविंदराव राजूरकरांनी आणि नंतर पती वसंतराव राजूरकरांनी स्वर घोटवून घेतल्यामुळे गायकी पक्की झाली. यातून एक सुंदर स्वरशिल्प तयार झालं. हे स्वरशिल्प ग्वाल्हेर घराण्याची ढब लेवून आलं; म्हणून मालिनीताईंना ग्वाल्हेर घराण्याची गायिका म्हणतात इतकंच. अन्य कोणत्या घराण्याचा स्वरसाज त्यांच्या गळ्यावर चढला असता, तर त्यांचं घराणं बदललंही असतं कदाचित. इथं ग्वाल्हेर घराण्याविषयी मला थोडं सांगायला हवं. खयाल गायनप्रकारातले हे मान्यवर घराणं आहे. खयाल आणि टप्पा या प्रकारातलं सादरीकरण ही या दोन्ही प्रवाहांची ग्वाल्हेर घराण्याची ओळख सारखीच आहे. मालिनीताईच्या सरळ, निरागस, सोप्या आणि प्रामाणिक व्यक्तिमत्त्वासाठी त्या संगीतनाटकसूत्रधार नटेश्वरानं हीच तिन्ही गुणवैशिष्ट्य असणाऱ्या ग्वाल्हेर घराण्याची निवड करावी, यापेक्षा अधिक सुयोग तो काय असावा!

मालिनीताईंना ग्वाल्हेर घराण्याचं शिक्षण सुरू असताना अन्य घराण्याचं गाणंही खुणावत होतं. ग्वाल्हेर घराण्याचं गाणं स्वतः मुरवत असताना त्या घराण्याचा दुरभिमान वाटला नाही, हा त्यांच्या मोकळ्या स्वभावाचा एक पैलू आहे. त्या मनानं पारदर्शी असल्यामुळे त्यांना गंधर्व गायकी आवडली; पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या गायकीनंही त्या प्रभावित झाल्या; पं. कुमार गंधर्व यांची गाणं मांडण्याची पद्धती आवडली आणि जे जे सुरेल आणि अभिजात आहे ते ते मालिनीताईंनी समजून घेतलं. अर्थात यासाठी त्यांनी कोणताही आटापिटा केला नाही. सहजता त्यांच्यात सहजच असल्यामुळे हे आपसूक होत गेलं. मालिनीताई प्रत्येक रचना शुद्ध मनानं सादर करत गेल्या. ग्वाल्हेर गायकी ही काहीशी खड़ी गायकी आहे, यातल्या ताना पुरुषी वाटाव्यात अशा असतात. तरीही त्या मालिनीताईंच्याच गळ्यात शोभून दिसल्या, ते त्यांच्यातल्या शुद्ध भावामुळे. 'मोर बोले सावन की रितू' म्हणत केदारांनी आळवताना, त्यानंतर अत्यंत सहजतेनं 'कान्हा रे नंद नंदन' ही द्रुत बंदिश गाताना आपल्याला या शुद्ध भावाचा प्रत्यय येतो.

---

## सात्त्विक गायकीचा नंदादीप

**– साभार म.टा.**

मालिनीताई राजूरकर यांच्या निधनामुळे शास्त्रीय संगीतातील सात्त्विक, ऋजू गायकीचा नंदादीप निमाला आहे. ग्वाल्हेर घराण्याच्या आक्रमक, मर्दानी गायकीला मालिनीताईंनी घरंदाज, सोज्ज्वळ, शालीन शक्तिरूप दिले. प्रसिद्धीचा हव्यास न धरता आयुष्यभर त्या संगीताची सेवा करीत राहिल्या. गायिका मालिनी राजूरकर आणि व्यक्ती मालिनी राजूरकर वेगळ्या भासत असल्या, तरी अंतरीच्या शुद्ध भावामुळे व्यक्ती म्हणून त्यांच्यात असलेल्या गुणांचे, गायिका म्हणून असलेल्या आगळ्या व्यक्तिमत्त्वाशी अद्वैत झाले होते. टप्पा गायकी त्यांनी लोकप्रिय केली असली, तरी शास्त्रीय संगीताच्या सर्व पैलूंचे दर्शन त्या आपल्या सुरेल गायनातून घडवायच्या. मैफली जिंकण्याचे काही कसबी गायकांचे एक तंत्र असते. त्यात क्वचित चित्रापेक्षा चौकटच वरचढ होते. मालिनीताईचे गाणे खळाळत वाहणाऱ्या झऱ्यासारखे अंतर्बाह्य निर्मळ होते. त्यामुळे त्या गाण्याला बाह्य महिरपीच्या सजावटीची कधी गरज पडली नाही. मैफलीतले गाणे ही ऐकण्यासोबतच पाहण्याची गोष्ट होत चालली आहे की काय, असे वाटावे अशा आजच्या काळात मालिनीताईंना गाताना बघणे म्हणजे संध्याकाळच्या समयी देवघरात उजळलेल्या नंदादीपाच्या प्रकाशात स्वतःला उजळवून घेणे होते. मालिनीताईंचा जन्म राजस्थानातील अजमेरचा. वसंतराव राजूरकरांकडे गाणे शिकताना त्यांनी वसंतरावांशीच आयुष्याची गाठ बांधली. नंतर अनेक वर्षे त्या हैदराबादमध्येच राहत होत्या. शेवटचा श्वासही त्यांनी त्या शहरातच घेतला. मृत्यूनंतर देहदान केले. महाराष्ट्रातील रसिकांना त्यांच्या गाण्याची ओढ असायची. पुण्यात सवाई गंधर्व किंवा राज्यात अन्यत्र विविध शहरांत

होणाऱ्या संगीत महोत्सवांत त्यांचे गाणे ऐकायला मिळेल, म्हणून मराठी रसिक धडपडत त्या ठिकाणी जायचे. मालिनीताईंनी त्यांना कधी निराश केले नाही. आपल्या आवाजाचा, ताकदीचा, क्षमतेचा त्यांना पुरेपूर अंदाज होता. एखाद्या दिवशी मनासारखे गाणे झाले नाही, तर त्यांना त्याची टोचणी लागून राहायची. मालिनीताईंसारख्या गायिकेने कधी आपली मठी तयार केली नाही, की विपुल शिष्यपरिवार मिरवला नाही. त्या निखळ स्वानंदासाठी गायल्या. त्या अलौकिक गायनाचे चांदणे रसिकांच्या अंगणात सांडत राहिले. आता ते चांदणे लोप पावले असले, तरी मालिनीताईंच्या स्वरांचे तारांगण आपल्या मनात झगमगतच राहील. त्यांना श्रद्धांजली!

---------------------------------------------

## इसरो मध्ये असलेले हजारो शास्त्रज्ञ येतात कोणत्या संस्था/कॉलेज मधून....??

**साभार–पी. आर. कुलकर्णी**

चांद्रयान ३ च्या यशानंतर इसरोवर आणि त्यातील शास्त्रज्ञ यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ते योग्यच आहे. अंतराळात यान पाठवणे, यान चन्द्र किंवा एखाद्या ग्रहावर उतरवणे या गोष्टी कल्पनेपलीकडील अत्यन्त अवघड, गुंतागुंत असलेल्या असतात हे आपण सर्वजण जाणतो. या मोहिमांमध्ये हजारो इंजिनिअर, शास्त्रज्ञ अहोरात्र राबलेले असतात. हे सगळे येतात कोणत्या संस्था/कॉलेज मधे शिकून हा प्रश्न अनेकांना पडला असेल.

ही माहिती देण्यासाठीच हे लिखाण....

यातील फक्त २ टक्के IIT/NIT येथून येतात हे वाचून आश्चर्य वाटेल.

हे शास्त्रज्ञ येतात ते तिरुअनंतपुरम् येथे असलेल्या Indian Institute of Space Science and Technology (IIST) या कॉलेज मधून. Deemed University असलेले हे स्वायत्त कॉलेज Department of Space, Government of India यांच्या कक्षेत येते. या कॉलेजची स्थापनाच अंतराळ संशोधन, इसरो साठी तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी झाली आहे.

या क्षेत्रातील विविध शाखांमध्ये इ. Tech/M. Tech/Ph.D. शिक्षणाची सोय येथे आहे.

येथून पदवीधर होणारे तरुण इसरो व अन्य अंतराळ संशोधन आस्थापनात अग्रक्रमाने घेतले जातात. इथे पदवीधर झाल्यावर First Right- to- Employ हा इसरोचा असेल हे आधीच लिहून घेतले जाते. इसरोने नाही म्हटले तरच इथला पदवीधर अन्यत्र नोकरी करू शकतो. अशी अट ठेवण्याचे कारण इसरोकडून पूर्ण तांत्रिक साहाय्य कॉलेजला मिळते. थोडक्यात इथे पदवी घेतली की इसरोत नोकरी पक्की!

सरकारी कॉलेज असल्याने अन्य इंजिनिअरिंग कॉलेजपेक्षा येथे फी माफक आहे. प्रवेश JEE परीक्षेवर वर असतो.

या कॉलेजची माहिती बहुदा फार जणांना नसावी. आजपर्यंत मी या कॉलेजला जाणार असे म्हणणारा आपल्या भागात कोणी पहिला नाही. दक्षिण भारतात हे कॉलेज माहीत असावे. त्यामुळेच इसरोत दक्षिण भारतीय जास्त असावेत. हे सर्व मी मुद्दाम माहितीसाठी लिहीत आहे. संशोधक, शास्त्रज्ञ सर्व भारतातून तयार झाले पाहिजेत. आज फक्त अभिनंदनाचा वर्षाव हे तात्पुरते झाले. आपल्या पुढच्या पिढीत या कॉलेजला जाणारी मुले-मुली असायला हवीत.

अंतराळ संशोधन क्षेत्र वाढत आहे. अधिक माहितीसाठी कॉलेजची वेबसाईट iist.ac.in पहावी. माहिती उपयुक्त ठरेल असे वाटते.

-----------------------------------------

## जगेन तुझियासाठी

(Home They Brought... Her Warrior Dead)

त्या मृतवीराला घेउन आले धार्मी
ठेविले भूमिवर चिरनिद्राविश्रामीं
तैं त्याची कांता, जणु दगडाची मूर्ती
पाहि त्या एकटक, परंतु स्फुंदत नव्हती
पाहून तयाला शुष्क नयन जणु वदती
ती जिवाशिवाची कशी भंगली प्रीती
पाहून तियेला हळहळती बघणारे
ही भ्रमिष्ट झाली? अजुनि रडेना का रे?
अतिदुःखें हिजला कशि मूर्च्छाही ये ना?
या चला, करूया वीराच्या गुणगाना
हा युद्धभूमिवर सिंहाऐसा लढला
मारुनी सातजण, धारातीर्थी पडला
वीराने केवळ उद्धरिले ना गोत्र
अजरामर केले जगिं शौर्याचे स्तोत्र
धन्यता पावलीं याची मातापितरें
हा चढतचि गेला उंच कीर्तिची शिखरें
दाटून येतसे कंठ ऐकणाऱ्याचा
दगडाच्या मूर्तिस परी फुटेना वाचा
परि वळली नाही मुळीं, सुन्न ती बैसे
कुजबुजती सारे, आता करावे कैसे?
देऊन भुईला हात, मावशी उठली

बाहेरी गेली, युक्ति तिची तरि कुठली?
चिमुकला पुत्र वीराचा घेउन आली
ती चिमणी मूर्ती अंकिं आइच्या दिधली
हस्ताच्या धारा नयनांवाटे आल्या
मग गालांवरती मुक्त सरी ओघळल्या
ढाळिते तयाच्या अश्रु मस्तकावरती
बाळा रे माझ्या! जगेन तुझियासाठी!
मी जगेन तुझियासाठी!

**भाषांतर – सौ. अरुणा करंदीकर**

---

## आकर्षक ऑफर्स आणि सवलतींपासून सावध रहा

**– सौ. रागिणी बक्षी**

सणासुदीचा कालावधी सुरू होत आहे. गणेशोत्सव, नवरात्री, दसरा, दिवाळी या शुभ मुहूर्तावर खरेदी अधिक असते. सोन्या चांदीसोबतच लोक त्यांच्या स्वप्नातील घर खरेदी करण्यासाठी अशा संधीची निवड करतात. त्यामुळेच बिल्डर्स याप्रसंगी आकर्षक ऑफर आणि सवलतीही देतात. अशा परिस्थितीत खरेदी करण्यापूर्वी सर्व प्रकारची तपासणी केल्यानंतरच बुकिंगकडे जायचे. केवळ आकर्षक ऑफर आणि सवलतीमुळे तुम्ही घर खरेदी केले तर इतर गोष्टींमध्ये तुमची फसवणूक होऊ शकते. त्यामुळे सर्व तपास करूनच अंतिम निर्णय घ्या.

**ऑफर किती आहे ?** सणासुदीला बहुतांश लोक घरखरेदीला पहिली पसंती देतात. हे पाहता बिल्डर्सदेखील जीएसटी माफी किंवा ताबा मिळेपर्यंत ईएमआय यासारख्या ऑफर देतात. दरवर्षी सणासुदीच्या काळात खरेदीदारांसाठी ऑफर्सचा पाऊस पडतो. सध्या खरेदीवर किमान डाऊन पेमेंट, जीएसटी माफी, ताबा मिळेपर्यंत ईएमआय नाही, फ्लॅट डिस्काऊंट, मोफत पार्किंग अशा ऑफर दिल्या जात आहेत. या प्रमोशनल ऑफर म्हणून वापरल्या जात आहेत. हा ट्रेड विशेषतः मेट्रो शहरांमध्ये दिसून येतो.

**जीएसटीमध्ये सूट देण्याचा नियम काय आहे ?** अनेक बांधकाम व्यावसायिक जीएसटीमध्ये सूट देत आहेत. तो कायदेशीरदृष्ट्या योग्य असेल तेव्हाच खरेदीदारांसाठी फायदेशीर करार होऊ शकतो. आम्ही तुम्हाला सांगतो की, ज्यांनी भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्युपन्सी सर्टिफिकेट) घेतलेले नाही अशा बांधकामाधीन प्रकल्पांवर १२ टक्के जीएसटी आकारला जातो. तर, रेडी-टू-मूव्ह-इन घरांवर जीएसटी लागू नाही. अशा प्रकारे केवळ कायदेशीररीत्या वैध जीएसटी सूट लाभदायक आहे.

**भेटवस्तूंना भुलू नका –** डेव्हलपर्स सणासुदीच्या काळात महागडे मोबाइल्स, कार, परदेशी सुट्ट्या, होम फर्निशिंग आणि फ्री क्लब मेंबरशिप यासारख्या ऑफरदेखील

देतात. या ऑफर्सच्या वास्तविक फायद्यांचे मूल्यांकन करणे कठीण आहे, परंतु असे दिसून आले आहे की बहुतेक प्रकरणांमध्ये त्यांचा कोणताही फायदा होत नाही. विकासकाने तुम्हाला दोन लाख रुपयांचे फर्निचर मोफत दिले तर तेच फर्निचर तुम्हाला बाजारात खूपच कमी किमतीत मिळेल हे नाकारता येणार नाही. असे देखील होऊ शकते की ऑफरमध्ये तुम्हाला मोफत कार किंवा मोफत बाइकची गरज नाही. मोफत आजीवन क्लब सदस्यत्व तुम्हाला याची गरज भासणार नाही. अशा परिस्थितीत रोख सवलत घेणे चांगले. त्याचा फायदा स्पष्टपणे दिसून येतो. त्यामुळे मोठी खरेदी करण्याचा भार कमी.

**आपण घर कधी खरेदी करावे ?** घर खरेदी करताना अगोदरच योग्य नियोजन करावे लागते. यामध्ये तुम्हाला घराचे लोकेशन, प्रॉपटीचा प्रकार, किंमत आणि फायनान्स स्कीम अशा अनेक गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. जर तुम्ही काळजीपूर्वक विचार करूनच घर घेण्याचे ठरवले तर ही चांगली वेळ असू शकते. बचत करण्यासाठी, घर खरेदीदारांना बाजारात येण्यासाठी वेळ आहे. अलिकडच्या काळात मालमत्तेच्या किमतींवर दबाव आहे. तसेच, स्टॉक वाढल्याने डीलर्सचा देखील घरे विकण्याकडे अधिक कल आहे, त्यामुळे ही गुंतवणूक करण्याची योग्य वेळ असल्याचे सिद्ध होऊ शकते. अंदाजानुसार यंदाच्या सणासुदीच्या काळात रिअल इस्टेट बाजारात तेजी येऊ शकते.

---

## सौदामिनीतंत्र

**– साभार – सुरेखा**

भारद्वाज ऋषींनी आपल्या सौदामिनी तंत्र या ग्रंथात विजांचे (Electricity) ५ प्रकार सांगितले आहेत. ते खालील प्रमाणे आहेत.

१) रेशीम, कोल्हा, ससा किंवा मांजर या प्राण्यांचे कातडे हवेत झटकले तर उत्पन्न होते ती 'तडित' वीज. (पाश्च्यात शस्त्रज्ञ अद्याप हिचा काहीच उपयोग करीत नाहीत.)

२) स्फटिक, रेशीम, लाख वगैरे जिनसा एकमेकांवर घासल्यावर उत्पन्न होते ती 'सौदामिनी' वीज.

३) आकाशात ढगात उत्पन्न होते ती 'चपला' हिलाच विद्युत, चंचला असेही संबोधतात.

४) विद्युतकुंभ (Battery) मध्ये उत्पन्न होणारी वीज ती 'शतकोटी'. अगस्त्य ऋषी हिला 'मित्रावरुणौ' म्हणतात. मित्र म्हणजे धन व वरुण म्हणजे ऋण वीज होय. कार्य करण्यासाठी शंभर कुंभ वापरावे लागतात म्हणून हिला 'शतकुंभी' अथवा 'शतकोटी' असेही म्हणतात.

५) लोहचुंबकाचे फिरण्याने उत्पन्न होऊन एका भांड्यात साठवली जाणारी

ती 'हादिनी' वीज. वीज साठवण्याच्या भांड्याला हूद (Storage Battery) म्हणतात. वशिष्ठ, अगस्त्य व भारद्वाज यांनी विजेच्या शास्त्रांवर ग्रंथ लिहिले आहेत. विमानशास्त्रांवर नारायण, वाचस्पति, शौनक, गर्ग व भारद्वाज यांचे ग्रंथ आहेत.

वरील माहिती श्री. कृष्णाजी विनायक वझे (१८६९ - १९२९) यांच्या लेखातून घेतली आहे. श्री. कृष्णाजी विनायक वझे हे इंजीनिअर होते. त्यांनी सिंध मधील सिंधू नदीवर सक्करचे प्रसिद्ध धरण बांधले त्याबद्दल इंग्रज सरकारने त्यांना 'रावबहादूर' ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला होता. पुढे लो. टिळकांच्या सांगण्यावरून त्यांनी इंग्रज सरकारची पदवी परत केली व स्वत:ला भारतीय शिल्पशास्त्राच्या संशोधनाच्या कार्यात वाहून घेतले. त्यांनी अनेक भारतीय प्राचीन वास्तु शिल्प शास्त्रांच्या ग्रन्थांचा अभ्यास केला. पण दुर्दैवाने त्यांचे बरचसे लिखाण आज काळाच्या उदरात गडप झाले आहे. सध्या त्यांचे केवळ एकच पुस्तक उपलब्ध आहे. त्यांनी त्यांच्या या संशोधन कार्यात ज्या प्राचीन ग्रन्थांचा अभ्यास केला ती यादी केवळ पाहीली तर थक्क व्हायला होते. त्यातीलही बरेचसे ग्रन्थ आज नष्ट झाले आहेत पण जे आहेत त्यांचा अभ्यासही खूप मोठा आहे. अनेक संस्कृत ग्रंथांचा अभ्यास करून त्यावेळी आपला समाज किती प्रगत होता याविषयी सांगताना श्री वझे म्हणतात की, गेल्या ३० वर्षात संस्कृत ग्रंथांचा विचारपूर्वक अभ्यास केल्यावर भौतिक शास्त्रमय शिल्पात हिंदुस्तानात किती ज्ञान होते याबद्दलचा एक निबंध मी इतिहास संशोधक मंडळासमोर वाचला. मी आपल्या माहीतीसाठी येथे इतकेच सांगतो की, वाफेच्या यंत्राखेरीज बहुतेक आधुनिक शिल्प (मशीन्स) आपल्याकडे एके काळी होती असे मला आढळून आले आहे.

आजच्या शिक्षण पद्धती विषयी श्री. वझे म्हणतात की, इंग्रजी राज्य हिंदुस्थानात आल्यावर इंग्रजानी केलेली सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी इंग्रजीतून शिक्षण देण्यास सुरुवात केली. यामुळे इंग्रजी ज्ञान व त्याचा फैलाव हिंदुस्थानात झाला. तशातच सरकारी नोकऱ्यात ज्ञानापेक्षा इंग्रजी भाषेला अधिक प्राधान्य प्राप्त झाल्याने प्राचीन हिंदू ज्ञानाकडे लोकांचे दुर्लक्ष झाले. याचा परिणाम असा झाला की, भारतात विचार करण्यासारखे ग्रंथच नाहीत व सर्व उत्तम ज्ञान काय ते पाश्चिमात्यांकडेच आहे अशी मोठ्या समजल्या जाणाऱ्यांची समजूत झाली. ज्याप्रमाणे वेदांतात हेगेल, कांट, शोपेनहार, प्लेटो, सॉक्रेटिस, मिल, ह्यूम यांच्या वेदांताचे जितके व जसे शिक्षण दिले गेले तसे पतंजली, कणाद, जैमिनी, बादरायण यांच्या वेदांताचे दिले गेले नाही. हीच अवस्था इतर विषयांच्या बाबतीतही झाली. ज्यांनी मोठमोठी राज्ये चालविली, किल्ले, कालवे, इमारती, पूल वगैरे बांधले, सूक्ष्म विचार करण्यात ज्यांची बुद्धी फार कुशाग्र अशी ज्यांची ख्याती, असे लोक भौतीकशास्त्रांशिवाय राहिले कसे? अशी सहज येणारी शंकासुद्धा या पंडितांना आली नाही.

-----------------------------------------

## ज्या व्यक्तीने ही काव्य रचना केली त्याला शतशः दंडवत.

**– सौजन्य – सौ. सुनंदा कुळकर्णी**

काल रात्री गणपतिबाप्पा, होता टिळकांशी भांडत,
आपल्या अडचणींची कैफियत, होता पोटतिडकीने मांडत ।।
देवघरातून तू मला, बाहेर का आणलंस ?
तुमच्या लाडक्या देवाचं कौतुक, कशाला चार-चौघात मांडलंस ?
गायलास तू सुरुवातीला, ताल-सुरात आरत्या,
केलीस साधी फुलांची आरास, भोवती रंगीत बत्त्या.
खूप मस्त छान असायचं, आनंद वाटायचा येण्यात,
सुख-शांती-समाधान मिळे, चैतन्य तुला देण्यात.
दहा दिवस उत्सवाचे म्हणजे, असे, दिव्यत्वाची रंगत...
काल रात्री गणपतिबाप्पा, टिळकांशी होता भांडत ।।
पूर्वी प्रवचन, कीर्तन, गायनाने, मंगलमय वाटायचे,
प्रबोधक, उद्बोधक भाषणांनी, विचार उंची गाठायचे.
आत्तासारखा हिडीसपणा, मुळीच नव्हता तेव्हा,
शांताबाईच्याच नावाचा, आता अखंड धावा.
पीतांबर, शेला, मुकुट, हे माझे खरे रूप,
शर्ट, पँट, टोपी, पागोटे, धिंगाण्याला फक्त हुरूप.
शाडूची माती... नैसर्गिक रंग, गायब आता झाले कुठे ?
लायटिंग केलेल्या देखाव्याने, मला दरदरून घाम फुटे !
श्रद्धा, भक्तिभाव, आदर मनीचा, गेला ना रे सांडत...
काल रात्री गणपतिबाप्पा, टिळकांशी होता भांडत ।।
माणसां-माणसांनी एकत्र यावे, एकमकांना समजून घ्यावे,
देव-घेव विचारांची करतांना, सारे कसे एक व्हावे.
जातीभेद नसावा... बंधुभाव असावा,
सहिष्णुतेच्या विचारांनी, नवा गाव वसावा.
मनातला विचार तुझ्या, खरंच होता मोठा,
पण, आज मात्र खऱ्या विचारांनाच, बघ मिळालाय फाटा.
पूर्वी विचारांबरोबर असायची, खाण्यापिण्याचीही रेलचेल,
आता मात्र देखाव्यांमागे, दडलेला असतो काळा खेळ.
पूर्वी बदल म्हणून असायचे, पोहे-चिवडा-चहा-कॉफी...
साग्रसंगीत जेवणासोबत, लाडू-मोदक-पेढे-बर्फी.
आता, रात्री भरले जातात, पडद्यामागे, मद्याचे पेले
डी. जे. वर नाचत असतात, माजलेले दादांचे चेले.
नको पडूस तू असल्या फंदात, तेव्हाच मी होतो सांगत...

काल रात्री गणपतिबाप्पा, टिळकांशी होते भांडत ।।
कशासाठी उत्सव असा, सांग ना रे बांधलास ?
देवघरातून गल्लोगल्ली, डाव माझा मांडलास !
दहा दिवस कानठळ्यांनी, होतो मला आजार,
व्यवहारी दुनिया इथली, इथे चालतो लाखोंचा बाजार.
रीतिरिवाज, आदर-सत्कार, मांगल्याचा नाही पत्ता,
देवघराऐवजी माझा, रस्त्यावरती सजतो कट्टा.
जुगार-दारु-सट्टा-मट्टा, अनैतिकतेला येतो ऊत,
देवाऐवजी दैत्याचेच मग, मानेवरती चढते भूत.
सामाजिक बाजू सोडून सुटतो, राजकारणालाच इथे पेव,
गौरी-गणपती सण म्हणजे, गैरव्यवहाराची ठेव-रेव.
नको रे बाबा, नको मला हा, मोठेपणाचा तुझा उत्सव,
मला आपले तू माझ्या जागी, परत एकदा नेऊन बसव.
कर बाबा कर माझी सुटका, नको मला ह्यांची संगत...
काल रात्री गणपतिबाप्पा, टिळकांशी होते भांडत ।।
आपल्या अडचणींची कैफियत, होता पोटतिडकीने मांडत,
काल रात्री गणपतिबाप्पा, टिळकांशी होते भांडत ।।

---

**वैदर्भीय संतांची जीवन चरित्रे क्रमशः मासिकात देणार आहोत त्यातील पहिले पुष्प**

# संत तुकडोजी महाराज

**– डॉ. कुंदा वाडेकर**

संत ज्ञानेश्वर जेव्हा रागावून, ताटी लावून बसले होते, तेव्हा मुक्ताईने त्यांची समजूत घालण्यासाठी ताटीचे अभंग म्हटले व ज्ञानदेवांची समजून घातली.

विश्व रागे जाले वह्नी । संतजनी व्हावे पाणी ।।

तात्पर्य, संत हे तप्त जगाच्या सांत्वनासाठीच आहेत. संत हे परमेश्वर आणि जनलोक ह्यांच्यातील दुवाच असतात.

वैदर्भीय संतभूमीतील असेच तुकडोजी महाराज एका तेजस्वी हिऱ्यासारखे होते. 'माणूस द्या मज माणूस द्या' ही त्यांची आर्त हाक होती. अत्यंतिक गरीबीमुळे घरोघरी तुकडे मागून जगावे लागले. म्हणून, कदाचित् त्यांचे 'तुकडया' हे नांव प्रचलित झाले असावे.

अमरावती जिल्ह्यातील 'यावली' ही त्यांची जन्मभूमी! वडील बंडोजी व आई मंजुळा ह्यांच्या पोटी ३०/४/१९०९ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे नाव 'माणिकदेव' असे ठेवले गेले. अगदी लहानपणीच खेळणे, पोहणे, कुस्ती हे छंद जोपासतानाच कीर्तन करणे, काव्य करणे ह्या त्यांच्या गुणांची आईस ओळख झाली.

नाथ परंपरेतील विदेही संत आडकोजी महाराज ह्यांचा सहवास व अनुग्रह त्यांना लाभला. गुरूंनी त्यांना 'तुकड्यादास' ही नाममुद्रा दिली. त्यांचे गुरु समाधिस्थ झाल्यावर, त्यांचा विरह असह्य होऊन, ते थेट पंढरपूरला निघून गेले. पंढरपूरच्या वाळवंटात त्यांना काव्य स्फुरू लागले.

पुण्यक्षेत्र पंढरपुरी । बैसलो असतां चंद्रभागे तिरी ।
स्फुरूं लागली ऐसी अंतरी । विश्वाकार वृत्ती ।

पंढरपूरहून परत आल्यावर ते रामटेकच्या अरण्यांत निघून गेले. तेथे त्यांना एका अज्ञात योग्याने योग शिकवण.

विशेष विश्वनिरीक्षण। केले मनन सर्वकाळी।।

अशी त्याची दिनचर्या होती. त्यानंतर त्याची भ्रमंती सुरू झाली भजन-कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृतीचे कार्य सुरू केले. त्यांनी मंत्रतंत्रादि साधनांमधील दांभिकपणा समाजाला दाखवून दिला. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या, संतांच्या भेटी घेतल्या. भजन, कीर्तन, ज्ञानचर्चा, प्रवचने यांच्या माध्यमातून समाजविचारांना कलाटणी दिली. लोकांना एकत्र करण्यासाठी 'श्रीगुरुदेव' असा नामस्मरण मंत्र लोकांसमोर ठेवला.

१९३५ ला त्यांनी सालबर्डी या तीर्थक्षेत्री महायज्ञ केला. जनसमुदायाला कार्यप्रवृत्त करण्यासाठी गुरुकुंज मोझरीस 'श्रीगुरुदेव धर्मसेवाश्रम' स्थापन केला. म.गांधींनी त्यांना सेवाग्राम आश्रमांत एक महिना साग्रह ठेवून घेतले होते. १९४१ साली, 'जाग उठो बालवीरों, अब तुम्हारी बारी है। झूठी गुलामशाही क्या डर बना रही है।' अशी अनेक राष्ट्रभक्तीपर भजने रचली व गाईली. सोप्या लोकभाषेमुळे ती लगेच लोकप्रिय झाली.

'मनी नाही भाव म्हने देवा मला पाव। देव बाजारचा भाजीपाला नाही रे।
देव अशाने पावायचा नाही रे।'

अशी अनेक लोकप्रिय भजने हिंदीतही लिहिली खंजिरी भजन ही त्यांचीच देण आहे. त्यांनी ग्रामगीता, सार्थ आनंदामृत, गीता प्रसाद, बोधामृत अशा अनेक साहित्याची निर्मिती केली.

१९४३ ला मानवधर्माची शिकवण देण्यासाठी त्यांनी गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना करून शेकडो प्रचारक निर्माण करीत असतानाच व्यायामवर्ग, उद्योगवर्ग, महिला-उन्नती वर्ग, सामूहिक प्रार्थना, व्यसननिर्मूलन, बलसाधना, गोवंशरक्षण आदि कार्यक्रमही राबवणे.

हरिजनांना मंदिरप्रवेश मिळवून देण्यासाठी, स्वत:च्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करून त्यांनी १५०० मैलांचा भजनी दौराही केला. सतत कार्यप्रवृत्त असताना त्यांनी, हिन्दी व मराठीतून ५० गद्य-पद्य ग्रंथांची निर्मिती केली.

जीवघेण्या, कॅन्सरसारख्या व्याधीने त्यांना ग्रासले तरी त्यांचे कार्य सुरूच होते. भारताची उन्नती व्हायची असेल तर खेडेगावांची सुधारणा करणे आवश्यक

आहे. अज्ञान, दारिद्र्य, भोळ्या समजुती दूर करून, स्वतःचा उद्धार स्वतः करण्यासाठी महाराजांच्या 'ग्रामगीतेचा' जन्म झाला.

मंदिरी बैसुनी नाक दाबावे । त्यापेक्षा मार्गीचे काटे उचलावे ।
दुःखितांसि प्रेमे पाणी पाजावे । हे श्रेष्ठ तीर्थाहुनी।
एक हात खोदावी जमीन । हे पूजनाहूनि पूजन ।
परिणाम शेकडो व्याख्यानाहून । अधिक त्याचा ।।

अशा प्रकारचा उपदेश ग्रामगीतेत आहे. ग्रामगीतेचा महिमा वर्णन करताना ते स्वतः म्हणतात-

'ग्रामगीता माझे ह्रदय । त्यात बसले सद्गुरुराय ।
बोध त्यांचा प्रकाशमय । दिपवून सोडील ग्रामाशी ।

रंजल्या गांजल्यांचे कैवारी महाराज बालकाप्रमाणे निरागस होते. 'ऐ मेरे प्यारे मित्रों' असे सर्वांना संबोधित. हे संत विद्यापीठाचे कुलगुरूच होते.

आज तुकडोजी महाराज कँसर हॉस्पिटल रुग्णसेवा देत आहे. नागपूर विद्यापीठालाही त्यांचे नाव देण्यात आले आहे. ११/१/१९६७ रोजी महाराजांनी आपला देह पंचतत्त्वात विलीन केला. त्यांना शतशः नमन!!

---

**शाखावृत्त**

## मातृसेवा मासिक स्थापना १९६६
## वार्षिक अहवाल २०२२-२०२३

**- शीला राव, संपादिका**

आपल्या ह्या मातृसेवा मासिकाला सुरुवात होऊन ५६ वर्ष पूर्ण झालीत. आता ५७ वर्ष सुरू आहे. आपले हे लहानसे मासिक आतापर्यंत अगदी नियमित सुरू आहे. सगळ्यांना माहितच आहे की सध्या खूपच महागाई वाढत आहे. त्यामुळे तिची झळ मासिकालाही लागली आहे. छपाईचे आणि कागदाचे दरही वाढलेले आहेत. अर्थातच ह्याचा परिणाम आमच्या मासिकावरही झाला.

मी ६-७ महिन्यांपूर्वी देणग्या मिळवण्यासाठी आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद मिळालेला आहे. ज्यांनी भरघोस प्रतिसाद दिला ते श्रीमती शीला कऱ्हाडे -विक्रोळी, आशा कुलकर्णी-डिट्राईट मिशिगन, वासन्ती आळशी-व्हिएन्ना व्हर्जिनिया, डॉ. मोहन श्रीखंडे-मिशिगन, अंजली बापट-पुणे असे आहेत. इतरही बऱ्याच लोकांनी लहान-मोठ्या प्रमाणात देणग्या दिल्या आहेत. ह्या कारणाने आमची आर्थिक परिस्थिती थोडीशी सावरलेली आहे. पण अजूनही आम्हाला मदतीची गरज आहेच. आपल्याला माहित आहेच ह्या मासिकाची मी सहावी संपादिका आहे. मला हे काम सांभाळून आता दीड वर्षे झाली आहेत. मासिक अगदी माफक दरात दिले जाते. आमचा प्रयत्न मासिक अधिक वैविध्यपूर्ण, मनोरंजक आणि स्त्रियांसाठी उपयोगी करण्याचा आहे. पण ज्या उद्देशाने याची निर्मिती झाली ते

म्हणजे सर्व शाखांनी जास्त उत्साहाने यात सहभाग घ्यावा आणि सक्रिय रहावे, तो उद्देश सध्या सफळ झालेला दिसत नाही. तेव्हा माझी अशी सर्व शाखांना विनंती आहे की हे आपले सगळ्यांचे मासिक आहे. तेव्हा यात मनमोकळेपणाने सहभागी व्हा. तुमच्या शाखेची माहिती, कार्यक्रमाचे रिपोर्ट पाठवा.

२०२२-२३ ह्या कालावधीत आम्ही काही महत्त्वाचे अंक काढले. नोव्हेंबर २०२२ चा अंक जो 'कमलाताई कशा घडल्या, त्यांची पार्श्वभूमी काय होती' हे सांगण्याचा प्रयत्न केलेला होता. मार्च २०२३ च्या अंकात नागपूरातील प्रत्येक महिला आणि काही आपल्या कर्तृत्वाने प्रसिद्धीची वाटचाल करीत असलेल्या महिलांचा थोडक्यात परिचय देण्याचा प्रयत्न केला आहे.

आपल्या सहकार्याशिवाय आम्हाला काहीच करणे शक्य नाही. तेव्हा त्याची नेहमीच अपेक्षा आहे आम्ही तुम्हाला कधीही निराश करणार नाही ह्याची खात्री देते आणि विराम पावते.

**मासिकाची स्थायी समिती** – १. डॉ. अरुणा बाभुळकर-अध्यक्ष, २. डॉ. लता देशमुख-सचिव, ३. श्रीमती शीला राव-संपादिका, ४. श्रीमती वनिता पाटील-आमंत्रक ५. सौ. ममता चिंचवडकर, सदस्य ६. सौ. यश:श्री वाघ, सदस्य ७. श्रीमती सुरेखा देवघरे, सदस्य ८. श्रीमती शोभा पारळकर, सदस्य

---

**ऑक्टोबर २०२३ मधील महत्त्वाचे दिवस –**

२ लालबहादूर शास्त्री जयंती आणि महात्मा गांधी जयंती, १५ घटस्थापना, २४ दसरा, २८ कोजागिरी पौर्णिमा

---

## नंदनवन शाळा

**– यश:श्री वाघ**

नंदनवन दुर्बल मनस्क मुलांची शाळा, सीताबर्डी, नागपूर येथे दि. १३ सप्टेंबर रोजी तान्हा पोळा साजरा करण्यात आला. सुरुवातीला शिक्षकांनी मुलांना पोळा या सणाची माहिती दिली. मुलांनी घरून बैलाची सजावट करून आणली होती. स्वत: मुले विविध वेशभूषा करून आले होते. मुलांना बैल घेऊन रांगेत उभे करण्यात आले. त्यांच्या बैलांची प्रभारी मुख्याध्यापकांच्या हातून पूजा करण्यात आली. मुलांनी वर बांधलेले तोरण तोडून बैल घेऊन धावण्याच्या शर्यतीत मोठ्या उत्साहाने भाग घेतला. शर्यतीत जिंकणाऱ्या मुलांना बक्षीस आणि इतर सर्व मुलांना खाऊ वाटप करण्यात आला.

दरवर्षी प्रमाणे शाळेत गणेशोत्सव खूप उत्साहात साजरा करण्यात आला. हा उत्सव मुलांसाठी साजरा केला जातो, त्यामुळे त्यांच्याच हातून श्रीगणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली. दि. १९ सप्टेंबर रोजी दु.४ वाजता जोशी गुरुजींनी, कर्मशाळेचे श्री आळशी आणि मंथन व कुणाल या दोन विद्यार्थ्यांच्या हातून श्रीगणेश

स्थापना करवून घेतली. मुलांनी सांगितलेल्या सर्व सूचनांचे पालन करून व्यवस्थित पूजा व आरती केली. दरदिवशी वेगवेगळ्या विद्यार्थ्यांच्या हातून पूजा व आरती करवून घेण्यात आली. विविध स्पर्धा, गोपालकाला, आणि महाप्रसाद अशा कार्यक्रमांची दहा दिवस रेलचेल होती. मुले फार आनंदाने सर्व उपक्रमात सहभागी होत होती. दि. २८ ला वसतिगृह अधीक्षिका मॅडम व तेथील विद्यार्थ्यांनी गणेश विसर्जन केले.

---

## रोटरी क्लब ऑफ नागपूर डाऊन टाऊन नागपूर डिस्ट्रीक्ट गव्हर्नर व्हिजिट

**चित्रा तत्त्ववादी, प्रकल्प प्रमुख**

दि. १ ऑक्टोबर २०२३ सकाळी १० वाजता रोटरी क्लबचे पदाधिकाऱ्यांनी प्रकल्पाला भेट दिली. प्रकल्पात राबविण्यात आलेल्या व सध्या चालू असलेल्या उपक्रमांबाबत माहिती देण्यात आली. उपक्रम राबवीत असताना रोटरी क्लब ऑफ नागपूर डाऊन टाऊन नागपूर कडून मिळालेल्या सहकार्याची माहिती प्रकल्प प्रमुखांनी दिली.

दिव्यांगांना नोकरीकरिता आवश्यक असलेले इंग्रजी, मराठी, हिन्दी टायपिंग, कॉम्प्यूटर कोर्सेस, एम.एस. ऑफिस, डी.टी.पी., टॅली, एमएससीआयटी, CCC, Hardware networking, नि:शुल्क घेण्यात आले.

स्पर्धा परीक्षांची तयारी करता व काही कॉम्प्यूटर कोर्सेस घेण्याकरीता रोटरी कडून 'फॅकल्टी' ची मदत मिळाली. यामुळे लाभार्थींना बँकेत, पोस्टात, रेल्वेत, महानगरपालिका, खाजगी कंपनीत नोकऱ्या मिळाल्या. प्रकल्पातील एक विद्यार्थी 'यूपीएससी' परीक्षा देऊन (Providant Fund) कमिशनर या पदावर कार्यरत आहे. कॉम्प्यूटर इंजिनियर झालेल्या २ मुलांना परसिस्टंटसारख्या नामांकित कंपनीत नोकरी मिळाली.

२००४ पासून प्रकल्पाला रोटरीकडून आवश्यक ती मदत मिळत गेली. उदा. 'कॉम्प्यटर लॅब सेट अप', 'कॉप्यूटर्स, लेझर प्रिन्टर, मेंटेनन्स फ्री लॅब उपलब्ध करून दिली. शिलाई मशीन्स, पिको माशीन मिळाली. टेलरींग वर्क ॲपमुळे मुली त्यांचे लग्नानंतर घरी राहून अर्थाजन करीत आहेत. मानाने जीवन जगण्याची संधी त्यांना उपलब्ध झाली.

मागील वर्षी ८८८ चा क्लास घेतला. दिव्यांगांना तसेच फैमिली कोर्टामधील (स्वयंसिद्धा) शिकविण्यात आले. कॉम्प्यूटर टायपिंगचे प्रशिक्षण एका मुलीला दिले. कॉम्प्यूटर टायपिंग करता इंटरनेट सेवा आवश्यक आहे. आता एक वर्षाकरिता इंटरनेटची मदत मिळणार आहे.

कार्यक्रमाला उपस्थित डि.जी.मॅडम आशा वेणू गोपाल मॅडम, अध्यक्ष अभिजित देशपांडे, रोटरीचे पदाधिकारी व सदस्य, मा.से. संघाच्या पदाधिकारी पुष्पा भावे मॅडम व दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते.

पाहुण्यांनी कार्यक्रमाचे शेवटी समाधान व्यक्त केले व दिव्यांगांना देत असलेल्या या सेवा मनापासून, हृदयापासून होत असल्याचे मनोगत व्यक्त केले.

---

## मातृ सेवा संघ, सीताबर्डी, नागपूर 'श्रीमती सुलभा यशवंत निमदेवकर' निर्माण फर्टिलिटी केंद्र उद्घाटन समारंभ

**– डॉ. लता देशमुख**

मातृ सेवा संघ, सीताबर्डी सूतिकागृह, सीताबर्डी, नागपूर येथे 'श्रीमती सुलभा यशवंत निमदेवकर', निर्माण फर्टिलिटी केंद्राचा कोनशिला अनावरण समारंभ डॉ. नीलकण्ठ निमदेवकर, सेवानिवृत्त उपप्राचार्य, शिवाजी विज्ञान महाविद्यालय, नागपूर तसेच मातृ सेवा संघाच्या अध्यक्षा डॉ. अरुणा बाभुळकर यांच्या हस्ते दि. १३ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता बाह्यरुग्णविभागात संपन्न झाले.

प्रमुख अतिथी डॉ. निलकंठ निमदेवकर व अध्यक्षा डॉ. अरुणा बाभुळकर यांच्या हस्ते पद्मश्री कमलाताई होस्पेट यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. फित कापून केंद्राच्या कोनशिलाचे अनावरण करण्यात आले.

डॉ. नीलकण्ठ निमदेवकर यांचे डॉ. अरुणा बाभुळकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

डॉ. नीलकण्ठ निमदेवकर यांनी सूतिकागृहाद्वारे चालविण्यात येणाऱ्या 'निर्माण फर्टिलिटी केंद्रा'द्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवाकार्याचे कौतुक केले. केंद्रात सेवा देणाऱ्या स्त्रीरोग तज्ञ डॉ. रेश्मा गिरीपुंजे यांचे विशेष कौतुक करून त्यांच्या हस्ते त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला मातृ सेवा संघाच्या अध्यक्षा डॉ. अरुणा बाभुळकर, उपाध्यक्ष सौ. रश्मी भावे, सचिव डॉ. लता देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. वृषाली देशमुख, सहसचिव सौ. रूपा जुनघरे, स्त्रीरोग तज्ञ डॉ. रेश्मा गिरीपुंजे, नर्सिंग स्कूलच्या प्राचार्या श्रीमती कांचन बांते, सूतिकागृहातील सर्व डॉक्टर्स, कर्मचारी, सी.जी.ओ. प्रशिक्षणार्थी, प्रशिक्षणार्थी परिचारिका उपस्थित होते.

---

## मातृ सेवा संघ पंचवटी वृद्धाश्रम

झोया शेख यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमीत्त दि. ८/१०/२३ रोजी कारा फाउंडेशनतर्फे रुपा पंडीत यांनी कार्यक्रमाचे मासेसंघ पंचवटी वृद्धाश्रमात आयोजन केले होते. या कार्यक्रमात स्त्रीयांना साड्या व पुरुषांना शर्टपीस यांचे वाटप झोया शेख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी सर्व आश्रमवासीयांची भेट घेवून त्यांचे आशीर्वाद घेतले. काही आश्रमवासीयांनी मनोगत व्यक्त केले. या सर्व कार्यक्रमाचे चित्रीकरण करुन त्याचे प्रक्षेपण नागपुर मेट्रो व अन्य २ चॅनलवर दाखविण्यात येणार आहे.

---

## मातृ सेवा संघाच्या संस्थापिकाद्वय पुरस्काराकरिता आवाहन

मातृ सेवा संघाच्या आद्य संस्थापिका पद्मश्री कै. कमलाताई होस्पेट आणि कै. वेणूताई नेने यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक पुरस्कार दरवर्षी दि. १५ नोव्हेंबर रोजी देण्यात येतो. पुरस्कारासाठी प्रामुख्याने विदर्भातील या साधारणतः महाराष्ट्रातील कोठेही तळमळीने निरलस व समाजोपयोगी कार्य करणाऱ्या फक्त स्त्रियांचा विचार केला जातो. ही समाजसेवा कमीत कमी दहा वर्ष केलेली असावी, आणि समाजसेवेपासून स्त्रिया व मुलांना त्याचा कितपत फायदा झाला याचाही विचार केला जातो. ही समाजसेवा सामाजिक जीवनात कोणत्याही क्षेत्रात केलेली असावी हे विशेष.

पुरस्काराकरिता पाठविणाऱ्या स्त्री उमेदवाराने स्वतःची संपूर्ण माहिती फोटोसहित द्यावयाची आहे. उमेदवाराने केलेल्या समाजसेवेचे क्षेत्र, त्याचा एकूण गोषवारा व आजची स्थिती, तसेच केलेल्या समाजसेवेने समाजाला झालेला फायदा इत्यादीं बाबत एक निवेदन खालील पत्त्यावर सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत पोहचेल अशा बेताने पाठवावे. व्यक्ति किंवा संस्थांनी अशा व्यक्तींची नांवे सुचविण्यास हरकत नाही.

**अर्ज निवेदन पाठविण्याचा पत्ता: डॉ. लता देशमुख, सचिव,**
**मातृ सेवा संघ, उत्तर अंबाझरी मार्ग, सीताबर्डी, नागपूर – ४४००१०**

---



Regd. with the Registrar of Newspapers, New Delhi 11638/1966

## मातृसेवा संघ, सीताबर्डी, नागपूर

प्रमुख कार्यालय : उत्तर अंबाझरी मार्ग, सीताबर्डी, नागपूर – १०
दूरध्वनी ०७१२–२५२२२८७, ०७१२–२५२२३९३ / २५२३५९६

कार्यक्षेत्र

– शाखा –

१. सीताबर्डी, नागपूर २. महाल, नागपूर ३. वर्धा ४. भंडारा ५. आर्वी ६. जबलपूर ७. हिंगणघाट ८. ब्रह्मपुरी ९. बिलासपूर १०. वरोरा ११. चांदूररेल्वे १२. अकोला

– सीताबर्डी सूतिकागृहांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सुविधा –

बाह्यरुग्ण विभाग, शस्त्रक्रिया विभाग, बालरोग विभाग, अपूर्णकाल अर्भक विभाग, बृद्ध व स्त्रीरुग्णसेवा, कुटुंब कल्याण योजना, प्रसवपूर्व तपासणी, प्रसवोत्तर तपासणी, बालविकास चिकित्सा केन्द्र, पॅथॉलॉजी, सोनोग्राफी व कलर डॉपलर, पॅपस्मिअर टेस्ट (कॅन्सर निदान केन्द्र), कॉल्पोस्कोपी, एड्स, (आय.सी.टी.सी.टी.) प्रकल्प, मेमोग्राफी, संध्यादीप

शैक्षणिक कार्यक्रम

बहुउद्देशीय परिचारिका प्रशिक्षण केंद्र, सी.जी.ओ., डी.जी.ओ. –

नागपुरातील प्रकल्प / प्रवृत्ती –

* महिला व बाल कल्याण सीताबर्डी रुग्णालय आणि अनुसंधान संस्था, सीताबर्डी नागपूर ❊ सुधारित सहाय्यक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण केंद्र ❊ कर्मचारी महिला वसतीगृह, सीताबर्डी, नागपूर ❊ इन्स्टिटयूट ऑफ सोशलवर्क, बजाजनगर ❊ नंदनवन दुर्बलमनस्क मुलांची शाळा व संरक्षित कर्मशाळा, सीताबर्डी, नागपूर ❊ पंचवटी आश्रम ❊ मातृसेवा मासिक ❊ कर्मचारी महिला वसतीगृह, बजाजनगर ❊ 'स्नेहांगण' अपंग मुलांची शाळा ❊ कौटुंबिक सेवा सल्ला केंद्र, बजाजनगर व मासेस समाजकार्य संस्था बजाजनगर ❊ विकलांग मुलांचे पुनर्वसन प्रकल्प ❊ कुसुम विहार ❊ मेमोग्राफी सेंटर

Regd. with the Registrar of Newspapers, New Delhi 11638/1966
**प्रकाशक :** अध्यक्ष/सचिव, मातृसेवा संघ, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर – १०
**अक्षर जुळवणी व मुद्रक :** श्री एन्टरप्राईजेस, सीताबर्डी, नागपूर – ४४००१२